लोकमत

# कृषी पतसंस्था भूमिकेवर आज प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे आज, शुक्रवारी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये सकाळी १० ते ५ या वेळेत विविध कार्यकारी सहकारी सोसायटींच्या कर्मचाऱ्यांसाठी 'ग्रामीण विकासात प्राथमिक कृषी पतसंस्थांची भूमिका' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी दिली.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात आज मॅरेथॉनचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवांतर्गत शुक्रवार, दि. २१ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता कॅम्पसमध्ये मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात सहभागी झालेल्या सुमारे १९०० विद्यार्थी-विद्यार्थिनी या मॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत मॅरेथॉनला विद्यापीठासमोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून तेथूनच मॅरेथॉनला प्रारंभ करण्यात येईल, अशी माहिती क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली आहे.

सकाळ

# नव्या १८० महाविद्यालयांची ठिकाणे निश्चित

## बृहत आराखड्याचा प्रस्ताव तयार

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील नव्या एकूण १८० महाविद्यालयांची ठिकाणे (बिंदू) निश्चितीची प्राथमिक कार्यवाही आज पूर्ण झाली. विद्यापीठाचा २०२४ ते २०२९ या कालावधीसाठीचा बृहत आराखड्याचा प्राथमिक स्वरूपातील प्रस्ताव तयार करण्यासाठी या आराखड्याच्या जंबो कमिटीची (मुख्य नियोजन समिती) बैठक झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात कला, वाणिज्य, विज्ञान, फार्मसी, विधि, आर्किटेक्चर, व्यावसायिक आणि कौशल्यविकास अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरू करण्याचे प्रस्ताव बृहत आराखडा निश्चित करणाऱ्या समितीकडे आले. त्यांची विद्यार्थी संख्या आणि इतर महाविद्यालयांतील अंतर आदी निकषांवर छाननी करण्यात आली. त्यानंतर आज



बिंदू निश्चितीसाठी जंबो कमिटीची बैठक दुपारी राजर्षी शाहू सभागृहात सुरू झाली. त्यामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हानिहाय प्राप्त झालेल्या महाविद्यालयांच्या प्रस्तावावर चर्चा करून बिंदू निश्चित करण्यात आले. त्यांचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद या अधिकार मंडळांसमोर ठेवण्यात येईल. त्यानंतर २५ मे रोजीच्या अधिसभेत मांडण्यात येईल. या बैठकीला प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता, व्यवस्थापन आणि विद्या परिषद, अधिसभा सदस्य, संलग्नता विभागाचे उपकुलसचिव डॉ. विलास सोयम आदी उपस्थित होते.

" कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील प्रत्येक तालुका उच्च शिक्षणाच्यादृष्टीने स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे. तेथील शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांच्या मुलांना हवे ते शिक्षण त्यांच्या तालुक्यात उपलब्ध व्हावे याउद्देशाने नव्या महाविद्यालयांचे बिंदू निश्चित केले आहेत.

**-सिद्धार्थ शिंदे**, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य

21 APR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कबड्डीसह रस्सीखेच स्पर्धेमध्ये चुरस

## शिवस्पंदन क्रीडा महोत्सव; मॅरेथॉनमध्ये आज धावणार विद्यार्थी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन क्रीडामहोत्सवात तिसऱ्या दिवशी कबड्डी, रस्सीखेच आणि क्रिकेटमध्ये आज चुरस रंगली. या महोत्सवानिमित्त उद्या (ता. २१) सकाळी सात वाजता विद्यापीठ कॅम्पसमध्ये मॅरेथॉन होणार असून त्यामध्ये सुमारे १९०० विद्यार्थी खेळाडू धावणार आहेत. या मॅरेथॉनचा प्रारंभ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

'शिवस्पंदन'मध्ये गुरुवारी कबड्डीमध्ये महिला संघांत सामने चुरशीने झाले. त्यात वाणिज्य व व्यवस्थापन संघाने मायक्रोबायोलॉजी डिपार्टमेंट संघाला, तर तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाने बायोकेमिस्ट्रीच्या संघाला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. मायक्रोबायोलॉजीच्या संघाने बायोकेमिस्ट्रीच्या संघाला हरवून तृतीय क्रमांक मिळविला. पुरुष गटातील सामन्यात पर्यावरणशास्त्र विभागाने प्राणीशास्त्र विभागाला नमवून, तर तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाने गणित विभागाच्या संघावर मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला. रस्सीखेच स्पर्धेत कॉम्प्युटर सायन्स, फिजिक्स, तंत्रज्ञान अधिविभाग, वाणिज्य व व्यवस्थापन, अर्थशास्त्र, इंग्रजी, रसायनशास्त्र आणि समाजशास्त्र विभागाने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात रस्सीखेच स्पर्धा चुरशीने झाली.

**क्रिकेटमध्ये तंत्रज्ञान, वनस्पतीशास्त्र उपांत्यफेरीत**

क्रिकेटमध्ये तंत्रज्ञान, मायक्रोबायोलॉजी, वाणिज्य व व्यवस्थापन, वनस्पतीशास्त्र अधिविभागाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीतील पहिला सामना तंत्रज्ञान विरुद्ध वनस्पतीशास्त्र विभाग, तर दुसरा सामना मायक्रोबायोलॉजी विरुद्ध वाणिज्य व व्यवस्थापन विभाग यांच्यात होणार आहे.